जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

# दैनिक बीड लोकनेता

मंगळवार २८ जानेवारी २०२५

सज्जन व्यक्ती वाद टाळते. वाद घालणारी व्यक्ती सज्जन असू शकत नाही.

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत    संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

RNI-MAHMAR/2023/89402 Email : elokneta@gmail.com वर्ष : ०२ अंक : १३४ किंमत २ रुपये Lokneta News - लोकनेता न्युज 8459977904 epaper.lokneta.in

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ
मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

## राज्यात दुधाचा ‘महापूर’; गत आर्थिक वर्षात १ कोटी ७१ लाख लिटरचे दैनंदिन विक्रमी संकलन

**लोकनेता न्युज नेटवर्क**

**मुंबई :** सलग दोन वर्षे झालेला दमदार पाऊस, चारा-पाण्याची चांगली उपलब्धता, सहकारी आणि खासगी दूध संघांकडून स्पर्धात्मक दराने दूध खरेदी आणि सरकारी अनुदानामुळे समाधानकारक दर यामुळे आर्थिक वर्ष २०२३-२४मध्ये राज्यात प्रति दिन दूध संकलन विक्रमी १ कोटी ७१ लाख १८ हजार लिटरवर गेले. दुग्ध व्यवसाय विभागाने ही माहिती दिली असून, हे आजवरचे सर्वाधिक दूध संकलन ठरले आहे.

२०१६-१७ मध्ये दुधाचे जागतिक दर १७ रुपये प्रति लिटरवर आले होते. यंदा जागतिक पातळीवरही दूध उत्पादनात वाढ झाली आहे. बटर आणि दूध भुकटीच्या दरात घसरण झाल्यामुळे राज्यात दूध खरेदी दर २५ रुपयांवर आले. या काळात सरकारी अनुदानाचा शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला. सरकारने अनुदानासाठी ७५८ कोटी रुपये मंजूर केले आहेत. जुलै ते सप्टेंबर काळात संकलित झालेल्या दुधाच्या अनुदानापोटी सरकारने आजवर ५३८ कोटी रुपयांचे वितरण केले आहे, तर १५३ कोटी रुपयांचे वितरण बाकी आहे.

खासगी आणि सहकारी ४७१ दूध संघांकडून दूध खरेदी आणि प्रक्रिया होते. सरकारी अनुदानाचा शेतकऱ्यांना फायदा झाल्याचे दुग्धविकास आयुक्त प्रशांत मोहोड यांनी स्पष्ट केले.

वर्षनिहाय संकलन

| वर्ष | प्रति दिनलाख लिटर |
|---|---|
| २०१९-२० | ११६.४१ |
| २०२०-२१ | ११६.९९ |
| २०२१-२२ | १२१.५१ |
| २०२२-२३ | १२४.९५ |
| २०२३-२४ | १७१.१८ |

भेसळ रोखण्यासाठी संयुक्त कार्यवाही



भेसळीस आळा घालण्यासाठी कायद्याची कडक अंमलबजावणी करा, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. दुग्ध व्यवसाय विभागाच्या १०० दिवसांच्या आराखड्याचा त्यांनी आढावा घेतला.

भेसळीवर समन्वयाने प्रतिबंधात्मक कारवाई करण्यासाठी अन्न व औषध प्रशासन विभाग आणि दुग्ध व्यवसाय विकास विभाग यांच्यामार्फत संयुक्तरीत्या मोहिमा राबविण्यात येतील, असेही फडणवीस या वेळी म्हणाले.

# ई पंचनामा प्रकल्पाचे प्रायोगिक तत्वावर अंमलबजावणी करावी

### ई पंचनामा प्रकल्पाचे प्रायोगिक तत्वावर अंमलबजावणी करावी

**लोकनेता न्युज नेटवर्क**

मुंबई : नैसर्गिक आपत्तीमुळे बाधीत शेतक-यांना तातडीने मदत मिळावी, यासाठी जिल्हा प्रशासनाशी समन्वय साधून पीक नुकसान मदतीचे वाटप करण्यासाठी आवश्यक उपाय योजनांची प्रभावी अंमलबजावणी करावी, अशा सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्या.



मदत व पुनर्वसन आणि आपत्ती व्यवस्थापन विभागामार्फत शंभर दिवसात करावयाच्या कामकाजाचा आढावा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज सह्याद्री अतिथीगृह येथील बैठकीत घेतला.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, नैसर्गिक आपत्तीमुळे शेत पिकांचे नुकसान झाल्याने शेतकरी संकटात सापडतात. यातून सावरण्यासाठी शासन मदत जाहीर करते. शासनाने जाहीर केलेली मदत त्यांना तातडीने मिळावी, यासाठी संबधित शेतक-यांचे इ केवायसी प्रक्रिया तातडीने करून त्यांना थेट मदत दिली जावी.

ई पंचनामा प्रकल्पाचे प्रायोगिक तत्वावर अंमलबजावणी करण्यात यावी.

अमरावती आणि नाशिकमध्ये पूर्वसन प्राधिकरण कार्यान्वित करण्याबरोबरच अतिरिक्त ८ प्राधिकरणांसाठी मंत्री मंडळासमोर प्रस्ताव आणावा. १९७६ पूर्वी पुनर्वसन झालेल्या गावांसाठी दिलेल्या वस्तीमध्ये नागरी सुविधांची कामे पूर्ण करू ती ग्रामविकास विभागाकडे वर्ग करण्याबाबतही प्रस्ताव तयार करावा, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

राज्य आपत्कालीन प्रतिसाद केंद्र व जिल्हा आपत्कालीन प्रतिसाद केंद्रांचे अद्ययावतीकरण करावे. कोकण आपत्ती सौम्यीकरण व इतर महाराष्ट्रातील सौम्यीकरण प्रकल्पांची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

# ‘नीट’च्या प्रश्नपत्रिकेच्या स्वरुपात बदल

**लोकनेता न्युज नेटवर्क** मुंबई : वैद्यकीय पदवी प्रवेश परीक्षेची (नीट) प्रश्नपत्रिकेचे स्वरुप बदलण्याचा निर्णय राष्ट्रीय परीक्षा एजन्सीकडून (एनटीए) घेण्यात आला आहे. त्यानुसार आता परीक्षेतील पर्यायी प्रश्न वगळण्यात आले असून प्रश्नपत्रिका १८० प्रश्नांची असणार आहे. ही प्रश्नपत्रिका सोडविण्यासाठी विद्यार्थ्यांना तीन तासांचा कालावधी मिळणार आहे. करोना कालावधीमध्ये विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेत परीक्षेचे स्वरूप बदलण्यात आले होते. मात्र आता परीक्षा जुन्याच




पद्धतीनुसार घेण्याचा निर्णय एनटीएने घेतला आहे. करोना कालावधीमध्ये विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेत राष्ट्रीय परीक्षा एजन्सीने नीट यूजीच्या परीक्षेत बदल करण्याचा निर्णय घेतला होता. त्यानुसार नीट यूजीच्या परीक्षेमध्ये ‘अ’ व ‘ब’ असे दोन विभाग करण्यात आले होते. ‘अ’ विभागात ३५ अनिवार्य प्रश्न होते, तर ‘ब’ विभागामध्ये १५ पर्यायी प्रश्न होते. मात्र करोनाचा प्रादुर्भाव संपुष्टात आल्याने एनटीएने परीक्षा मूळ पद्धतीने घेण्याचा निर्णय घेतला आहे.या पद्धतीत प्रश्नपत्रिकेतून ‘ब’ विभाग काढून टाकण्यात येणार असल्याने पर्यायी प्रश्न नव्या प्रश्नपत्रिकेतून वगळण्यात येणार आहेत. त्यामुळे यापुढे नीट १८० अनिवार्य प्रश्नांची असेल. त्यात भौतिकशास्त्र आणि रसायनशास्त्रातील प्रत्येकी ४५ प्रश्न आणि जीवशास्त्रातील ९० प्रश्न असतील. हे प्रश्न सोडविण्यासाठी विद्यार्थ्यांना १८० मिनिटांचा म्हणजे तीन तासांचा कालावधी दिला जाणार आहे. तसेच करोनामध्ये परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना देण्यात आलेला अतिरिक्त कालावधीही कमी करण्यात आला आहे. नीट यूजीच्या नव्या पद्धतीनुसार विद्यार्थ्यांना तयारी करण्याचा सल्ला एनटीएकडून देण्यात आला आहे. प्रश्नपत्रिका नमुना: प्रश्नपत्रिकेत १८० अनिवार्य प्रश्न असतील. पर्यायी प्रश्नांची तरतूद वगळलीपरीक्षेचा एकूण कालावधी १८० मिनिटे (३ तास)

## अनाथ व निराधार लेकरांना आधार दिल्यास तेच समाज व देशाचा आधार बनतील:-प्रबुद्ध साठे

### शिक्षणाला सामाजिक जाणीव व संस्काराची जोड दिल्यास प्रजासत्ताक भारत यशस्वी होईल...! अनाथाचा नाथ काशीनाथ चौगुले यांचे कार्य कौतुकास्पद- साठे




**लोकनेता न्युज नेटवर्क**

**आष्टी (अण्णासाहेब साबळे)-**

शिक्षण हे राष्ट्र निर्माण करणारे साधन आहे, शिक्षणाचे खाजगीकरण व बाजारीकरण झाले असताना लोकसहभागातून निराधार,अनाथ मुलांसाठी महात्मा फुले बालसंगोपन केंद्र चालवणारे अनाथाचे नाथ काशीनाथ चौगुले यांचे कार्य कौतुकास्पद असून अशा निराधार लेकरांना आधार दिल्यास तेच देशाचा आधार बनतील,शिक्षणाला सामाजिक जाणीव व संस्काराची जोड दिल्यास प्रजासत्ताक भारत यशस्वी होईल असे प्रतिपादन चला आपल्या बुध्दाच्या घरी अभियानाचे प्रमुख व भारतीय बौद्ध धम्म संस्कार महासंघाचे संस्थापक अध्यक्ष- प्रबुद्ध साठे यांनी केले ते नेवासे तालुक्यातील घोडेगाव येथे महात्मा फुले बालसंस्कार केंद्राच्या वतीने उसतोडणी, वीटभट्टीमजूर, निराधार, अनाथ, उपेक्षित मुलांसाठी २६ जानेवारी प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने नवीन भव्य शैक्षणिक इमारतीचे भूमीपूजन कार्यक्रमात अध्यक्ष पदावरून बोलत होते,, रिपब्लिकन सेनेचे जिल्हा अध्यक्ष राजाभाऊ आढाव यांच्या हस्ते भूमीपूजन करण्यात आले , प्रजासत्ताक दिनाच्या मंगलमय शुभेच्छा देत व खरा अर्थ समजावून सांगत प्रबुद्ध साठे आपल्या भाषणात पुढे म्हणाले बहुजनांचे खरे स्वातंत्र्य प्रजासत्ताक दिन असून समाजातील शेवटचा माणूस राष्ट्राच्या मुख्य प्रवाहात येईल तेव्हाच या दिनाचे समाधान होईल,हे कार्य बालसंगोपन केंद्रातून होत असून विद्यार्थी शिक्षक व संस्था प्रमुख काशीनाथ चौगुले यांचे मी अभिनंदन व कौतुक करतो तसेच इथे मोठ्या प्रमाणात उपस्थित नाथपंथीय बांधव आमचे धम्म बांधवच आहेत कारण नाथपंथीय हा हिंदू पंथ नसून बौद्ध धम्मीय पंथ व परंपरा असून नाथपंथीय बहुरूपी डवरी गोसावी यांनी बौद्ध धम्माचा प्रचार केल्याचा इतिहास आहे, याप्रसंगी जेष्ठ साहित्यिक कवी सुभाष सोनवणे,प्राचार्य अंकुश अवघडे,नाना काळे दादासाहेब कदम,ज्ञानदेव पठारे,येळवंडे नाना,सुशांत मस्के,ज्योतीताई पवार,शिवराम शिंदे,आजिनाथ शिंदे,राहुल सावंत, मनिषा विधाटे,संस्थेचे संस्थापक अध्यक्ष- काशीनाथ चौगुले,शिवाजी सावंत,स्वाती मेनगर,गुणाबाई चौगुले,अमोल चौगुले,रत्ना पाटील व संस्थेचे सर्व पदाधिकारी होते,आभार ज्ञानेश्वर जगधने यांनी मानले, , कार्यक्रमास मोठ्या प्रमाणात नागरिक,विद्यार्थी उपस्थित होते

## मुख्यमंत्री निधी प्रक्रिया पेपरलेस

**लोकनेता न्युज नेटवर्क** मुंबई : राज्यातील गरजू रुग्णांना मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षातर्फे दिली जाणारी आर्थिक मदत मिळवण्याची प्रक्रिया पूर्णतः पेपरलेस करण्यात येणार आहे. याकरिता स्वतंत्र ऑनलाइन प्रणाली विकसित करण्यात येणार असल्याची माहिती मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाचे प्रमुख रामेश्वर नाईक यांनी दिली.मुख्यमंत्री देवेंद्र यांच्या फडणवीस नेतृत्वाखाली या निधीच्या माध्यमातून गरजू रुग्णांना आर्थिक मदत दिली जाते. यासाठी धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष ऑनलाइन प्रणाली (चॅरिटी पोर्टल) आणि मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष ऑनलाइन प्रणाली (सीएमआरएफ पोर्टल) एकत्रित जोडण्यात येणार आहे. यामुळे अर्ज प्रक्रिया सोपी होणार असल्याचे नाईक यांनी सांगितले.

## जिल्हाधिकारी कार्यालयात कक्ष

**लोकनेता न्युज नेटवर्क** जिल्हाधिकारी कार्यालयात मुख्यमंत्री सहाय्यता कक्ष सुरू करण्यात येणार आहेत. या कक्षामध्ये आलेल्या रुग्णांना, नातेवाईकांना अर्ज भरण्यास सहाय्य करणे, आर्थिक मदत झालेल्या रुग्णांची रुग्णालयात जाऊन भेट घेणे आदी कामे जिल्हा कक्षातून केली जाणार आहेत.

--------------------

## मराठीचा प्रसार करा

**लोकनेता न्युज नेटवर्क** मुंबई : दैनंदिन व्यवहारातही अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी मराठी भाषेचा जास्तीत जास्त वापर करावा. तसेच मराठी संस्कृती टिकवण्यासाठी मराठी भाषेचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा, असे प्रतिपादन महापारेषणचे संचालक (मानव संसाधन) सुगत गमरे यांनी भाषा संवर्धन पंधरवाड्यानिमित्त बोलताना केले.

## २२० कोटींच्या फसवणूक प्रकरणी ईडीकडून ७९ कोटींची मालमत्तेवर टाच




**लोकनेता न्युज नेटवर्क**

मुंबई : बँक फसवणूक प्रकरणी सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) नुकतीच ७९ कोटी ७८ लाख रुपयांच्या मालमत्तेवर टाच आणली. या मालमत्ता नवी मुंबई, मुंबई, सातारा, रायगड आणि डेहराडून, हरिद्वार, पौरी गढवाल (उत्तराखंड) येथील असून त्यात सदनिका,भूखंड, हॉटेल आणि शेत जमिनींचा समावेश आहे. शेरॉन बायो मेडिसिन लिमिटेड (एसबीएमएल) या फार्मा कंपनीविरोधातील २२० कोटी रुपयांच्या बँक फसवणूक प्रकरणात ईडीने ही कारवाई केली. या प्रकरणातील एकूण टाच मालमत्तेचा आकडा ९६ कोटी २० लाख रुपयांपर्यंत पोहोचला आहे, असे ईडीकडून सोमवारी सांगण्यात आले.

केंद्रीय अन्वेषण विभागाच्या (सीबीआय) लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने मोहन प्रसाद काला,

सविता सतीश गौडा, ललित शंभू मिश्रा आणि इतरांविरोधात दाखल केलेल्या तक्रारीवरून ईडी याप्रकरणी तपास करत आहे. सीबीआयने आरोपींवर बनावट कागदपत्रांचा वापर करून बँकांची फसवणूक केल्याचा आरोप केला आहे. शेरॉन बायो मेडिसिन लिमिटेडने बँकांचे सुमारे २२० कोटी रुपयांचे नुकसान केले आहे, असा आरोप आहे. एसबीएमएल औषध घटकांचे उत्पादन करते.

ईडीने दिलेल्या माहितीनुसार आरोपींनी बनावट कागदपत्रे व खोट्या करारांद्वारे बँकांकडून विविध कर्ज घेतले. एसबीएमएलने बँकांच्या क्रेडिट सुविधांचा गैरवापर करून त्या निधीचा अपहार केला. त्याचा वापर मालमत्ता खरेदी करण्यासाठी केला, असा आरोप आहे. याप्रकरणात बनावट विक्री आणि खरेदी करून उलाढालीचा आकडा वाढवण्यासाठी अनेक बनावट कंपन्यांचे जाळे तयार करण्यात आल्याची माहिती ईडीने दिली. या बनावट कागदपत्रांच्या आधारे कंपनीने बँकांकडून कर्ज घेतले. कर्ज मिळाल्यानंतर निधी अनेक बनावट कंपन्यांमार्फत वळवला गेला. या कंपन्या एसबीएमएलच्या कर्मचाऱ्यांच्या किंवा प्रमुख व्यक्तींच्या नातेवाईकांच्या नावावर तयार केल्या होत्या आणि त्यांचा वापर मालमत्ता खरेदी करण्यासाठी करण्यात आला.

# कोरोना विषाणू नैसर्गिक नव्हता : अमेरिकन गुप्तचर संस्थेचा अहवाल प्रयोगशाळेतून लीक झाल्याची पुष्टी

**दैनिक लोकनेता न्यूज नेटवर्क**

वॉशिंग्टन : अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षपदी डोनाल्ड ट्रम्प यांनी शपथ घेतली आहे. दुसऱ्या दिवशीपासूनच ट्रम्प ॲक्शनमोडवर आले आहेत. पहिल्या ट्रम्प यांनी पहिला कार्यकाळ गाजवला आहे, यामुळे आता जगभरात त्यांची चर्चा सुरू आहे. ट्रम्प सत्तेवर येताच सीआयएने कोरोना बाबत मोठा दावा केला आहे.

अमेरिकेची गुप्तचर संस्था सीआयएने कोरोना नैसर्गिक नसून तो प्रयोगशाळेतून लीक झाल्याचा मोठा दावा केला आहे. ट्रम्प यांच्या पहिल्या कार्यकाळातही कोरोनाव्हायरसला ट्रम्प यांनी चिनी विषाणू असे संबोधून शी जिनपिंग सरकारवर आरोप केले होते. अमेरिकेचा हा नवा दावा देखील



महत्त्वाचा आहे. लॉकडाऊन, आर्थिक संकट आणि लाखो मृत्यूंसाठी जबाबदार असलेल्या या विषाणूच्या उत्पत्तीचा प्रश्न जागतिक स्तरावर एक मोठा प्रश्न आहे. चीनने अमेरिकेच्या अहवालाचे वर्णन राजकीयदृष्ट्या प्रेरित असल्याचे म्हटले आहे.कोरोनाव्हायरस प्रयोगशाळेतून उद्भवण्याची शक्यता नैसर्गिक नाही, तर तो जाणीवपूर्वक प्रयोगशाळेत तयार करण्यात आला आहे, असा दावा सीआयएने केला आहे. कोरोना विषाणू चीनमधील प्रयोगशाळेतून चुकून बाहेर पडला किंवा नैसर्गिकरित्या उदयास आला याबाबत चिनी अधिकाऱ्यांकडून सहकार्याचा अभाव असल्याने या प्रश्नांची उत्तरे कधीच पूर्णपणे मिळणार नाहीत, असा दावाही गुप्तचर विभागाने केला आहे. एजन्सीने पुरावे सादर केले नाहीत

सीआयएने दाव्यात म्हटले आहे की, कोविड विषाणू निसर्गातून नव्हे तर प्रयोगशाळेत निर्माण झाला आहे. एजन्सीने या दाव्यांवर कोणतेही पुरावे सादर केले नाहीत. बायडेन प्रशासन आणि सीआयएचे माजी संचालक विल्यम बर्न्स यांच्या विनंतीवरून हा अहवाल तयार करण्यात आला होता. राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी नियुक्त केलेले सीआयए संचालक जॉन रॅटक्लिफ यांच्या विनंतीवरून शनिवारी ते सार्वजनिक करण्यात आले.

**सर्वाधिक प्रसार अमेरिकेत**

कोरोना विषाणूचा प्रसार अमेरिकेत सर्वाधिक झाला. अमेरिकेत लाखो लोकांनी प्राण गमावले. ट्रम्प यांनी त्यांच्या गेल्या कार्यकाळात कोरोना विषाणूबाबत चीनवर जोरदार निशाणा साधला होता. सार्वजनिकरित्या, त्यांनी अनेक वेळा कोरोनाव्हायरसचा उल्लेख चिनी विषाणू असा केला आहे.



# शेतकरी नेते मारोती गीते यांना सरपंच परिषद मुंबई महाराष्ट्राच्या वतीने शेतकरी भूषण पुरस्कार प्राप्त

**सरपंच डॉ देवानंद गोरे यांच्या हस्ते पुरस्काराने केले सन्मानित,**

**दैनिक लोकनेता न्यूज नेटवर्क**
**सेनगाव (महादेव हरण):-**

सेनगाव तालुक्यातील नागा सिनगी येथील रहिवासी असलेले शेतकरी नेते मारोती गीते यांनी अनेक समाज कार्य समाजसेवा केल्याने सरपंच परिषद मुंबई महाराष्ट्राच्या वतीने त्यांना शेतकरी भूषण पुरस्कार जाहीर केला असून २६ जानेवारी प्रजासत्ता दिनाचे औचित्य साधून त्यांना तो पुरस्कार सेनगाव तालुक्यातील पानकनेरगाव येथील डॉ. देवानंद गोरे यांच्या सरपंच परिषद कार्यालय मध्ये, सरपंचाच्यावतीने प्रदान केला आहे यावेळी उपस्थित सरपंच डॉक्टर देवानंद गोरे, अखिल भारतीय पत्रकार संघाचे हिंगोली जिल्हा अध्यक्ष गजाननराव देशमुख व इतर मान्यवरांच्या हस्ते शेतकरी नेते मारोती गीते यांना शेतकरी भूषण पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले,

# माहीम-वांद्रे स्थानकांदरम्यान पुलाच्या पुनर्बांधणीचा पहिला टप्पा यशस्वीरित्या पूर्ण

**लोकनेता न्यूज नेटवर्क**

मुंबई : पश्चिम रेल्वेवरील माहीम-वांद्रे स्थानकांदरम्यान असलेल्या पुलाच्या पुनर्बांधणीच्या कामाचा पहिला टप्पा यशस्वीरित्या पूर्ण झाला असून गेले काही दिवस ब्लॉक घेऊन पुलाचे काम करण्यात येत होते.

माहीम आणि वांद्रे स्थानकांदरम्यान मिठी नदीवरील पूल क्रमांक २० च्या दक्षिण तळाच्या पुनर्बांधणीचा पहिला टप्पा पूर्ण अनेक आधुनिक यंत्रांच्या मदतीने हे काम पार पाडण्यात आले. याशिवाय, दोन लोकोमोटिव्ह आणि सुमारे १०० कर्मचाऱ्यांच्या पथकाने दिवसरात्र काम केले, असे पश्चिम रेल्वेच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.

प्रवाशांची सुरक्षा आणि रेल्वे पायाभूत सुविधांना बळकटी देण्यासाठी हे काम करण्यात आले. जुन्या तंत्रज्ञानाचा वापर करून बनवलेला पूल कमकुवत झाला होता.



झाला असून त्या कामासाठी २४-२५ जानेवारी आणि २५-२६ जानेवारी रोजी ब्लॉक घेण्यात आला होता. या कामाच्या पहिल्या टप्प्यात क्रेनच्या मदतीने ४२ टन वजनाचे २०.४ मीटर लांबीच्या ४ आरएच तुळया उभारण्यात आल्या.

ब्लॉक कालावधीत रेल्वे रुळाखाली सुमारे २.५ मीटर खोदकाम करण्यात आले. ७०० टन क्षमतेची क्रेन, एक्स्कॅव्हेटर, डंपर ट्रक, हायड्रा लिफ्ट, टॅम्पिंग मशीन यांसारख्या आता आधुनिक तंत्रज्ञान आणि रचना वापरून त्याची पुनर्बांधणी केली. हा पूल आता मजबूत झाला असून प्रवाशांच्या सुरक्षेत वाढ झाली आहे. आता पुलाचे अनावश्यक भाग काढणे, तेथे पुनर्बांधणी करणे, तुळईवर रेल्वे मार्ग योग्यरित्या उभारणे असा आव्हानात्मक दुसरा टप्पा मे २०२५ मध्ये पूर्ण करण्याचे नियोजन आहे, अशी माहिती पश्चिम रेल्वेच्या वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली.

# हरवलेली पाखरे २५ वर्षानंतर एकत्र !

**राजेश्वर विद्यालयातील विद्यार्थ्यांचे स्नेह मेळाव्याचे आयोजन**

**लोकनेता न्यूज नेटवर्क**
**दौंड :-(बबनराव धायतोंडे)**

: - राजेश्वर विद्यालय राजेगाव विद्यालयाच्या २०००-२००१ मधील दहावीच्या विद्यार्थ्यांकडून आठवणींना उजाळा आपण ज्या शाळेत शिकलो, खेळलो,मोठं झालो,ते माजी विद्यार्थी तब्बल २५ वर्षांनंतर पुन्हा एकत्र आल्याने अनेकांचे डोळे आनंदाश्रूंनी पाणावले होते.राजेगांव (ता. दौंड) येथील राजेश्वर विद्यालय राजेगांव विद्यालयाच्या २०००-२००१ दहावीच्या बॅचच्या आठवणी पुन्हा जागविण्यासाठी राज्यभर विखुरलेल्या विद्यार्थ्यांनी माजी विद्यार्थी मेळाव्यास आवर्जून हजेरी लावली होती. ज्या शाळेत शिकलो त्याच शाळेत पुन्हा एकत्र येवून त्याच वर्गात बसून विद्यार्थ्यांनी जुन्या आठवणींना उजाळा दिला त्यांतर सर्व विद्यार्थी व शिक्षक खडकी येथील गोल्डन प्लाम रिसॉर्ट वरती एकत्र जमले त्यानंतर शिक्षक व वर्गातील गुणवंत विद्यार्थी यांचा शाल,श्रीफळ, पुष्पगुछ व सन्मान



चिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.यावेळी ॲड.तानाजी जगताप,निलेश ननवरे,अमोल मोरे,प्रेरणा जाधव,सुप्रिया दळवी यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

तसेच या स्नेहमेळाव्याच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी मुख्याध्याप दुर्गे,सोमनाथ तांबे,गाडेकर,हिंदुराव जाधव,वाळके विद्यमान मुख्याध्यापक वाघमोडे आदिनी माजी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले यावेळी दिलीप ढमे,कालिदास शेंडगे,दादा भोसले आदी शिक्षक उपस्थित होते. एवढ्या वर्षानी एकमेकांविषयी दाखवलेल्या आपुलकीचे कौतुक केले, माजी विद्यार्थ्यांनी शाळेच्या आठवणी सांगत शाळेविषयी कृतज्ञता व्यक्त केली. वय,पद,प्रतिष्ठा व व्यस्त दिनक्रम हे सर्व बाजूला ठेवून मैत्रीची भावना जोपासत विद्यार्थी आणि विद्यार्थिनी उत्साहात एकत्र जमले होते.तब्बल २५ वर्षांनी भेटत असल्याने एकमेकांची ओळख लागते का नाही,ही भावना त्यांच्या मनामध्ये होती. परंतु,एकत्र आले,भेट झाली अन् सर्वांनी जल्लोष केला.यावेळी सर्वच माजी विद्यार्थ्यांनी आपल्या शालेय जिवनातील आठवणींना उजाळा दिला.

एकत्रित केलेला अभ्यास,शिक्षकांचा वचक,खेळांच्या स्पर्धा,शिक्षकांनी दिलेली शिक्षा,नवनवीन उपक्रम अशा अनेक गप्पांच्या ओघात विद्यार्थी अक्षरशः आपले वयही विसरून गेले होते.यावेळी विद्यार्थ्यांनी एकत्र बसून स्नेहभोजनाचा आस्वाद घेतला.तसेच एकमेकांना पुढील वाटचालीसाठी निरोगी व आनंददायी जिवनासाठी शुभेच्छा देत निरोप घेतला. यावेळी विद्यालयाला झाडांचे वाटप करण्यात आले.

मुख्याध्यापक दुर्गे यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम पार पडला.कार्यक्रमाचे नियोजन अमोल मोरे व शैला इंदलकर यांनी केले तर सूत्रसंचालन ॲड. तानाजी जगताप व सुप्रिया दळवी यानीङ्केले.

क्र.२०२५/संकीर्ण/जन्म-मृत्यु नोंदणी/कावि-
कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसीलदार
सिंदखेड राजा
दि. २१/०१/२०२५

**जाहिरनामा**

जन्म मृत्यु नोंदणी प्रमाणपत्र मिळणेबाबत जन्म आणि मृत्युची नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ मधील कलम ११ अन्वये सर्व जनतेस तालुका सिंदखेड राजा यांना जाहिर केले जाते की, अर्जदार श्री. मधुकर कोंडीबा गिते रा. बूट्टा ता. सिंदखेड राजा जि. बुलढाणा यांनी नामे कोंडीबा काळू गिते यांचा मृत्यू दि. २८/०२/१९९० रोजी राहत्या घरी बुट्टा ता. सिंदखेड राजा जि. बुलढाणा येथे मृत्यू झाला असून अर्जदारांनी स्वतः सदरहू कायदेशीर मृत्यू नोंद असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळावे म्हणुन या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

करिता सदरहु अर्जदाराच्या कायदेशीर मृत्यू दिनांक २८/०२/१९९० रोजी कायदेशीर नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहिरनाम्याचे प्रसिध्दी तारखेपासून १५ दिवसाच्या आत त्याने ह्या कार्यालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरच असे कळविण्यात येते की जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखवल्या तर सदर कार्यालय सदरहु अर्जदार ह्यांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत झाल्यास त्यांना सदरहु अर्जदार नोंद कायदेशीर असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

**सही**
**कार्यकारी दंडाधिकारी तथा**
**तहसीलदार सिंदखेड राजा**

# मौजे कारला जिल्हा परिषद प्राथमिक शाळा येथे ७६ वा प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा

## एस टी महामंडळ बस चालक माधवराव वाघमारे यांच्या कडून विद्यार्थ्यांना लिहण्यासाठी पॅड वाटप

**लोकनेता न्यूज नेटवर्क**
**उमरी महेश पडोळे**

उमरी तालुक्यातील मौजे कारला जिल्हा परिषद प्राथमिक शाळा येथे ७६व्या प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने शाळेमध्ये गावातील प्रतिष्टीत नागरिक सर्व प्रथम भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकर व राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन करून सर्वांच्या उपस्थितीत मोठ्या आनंदात मुख्याध्यापक श्री गजानन जाधव सर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

अतिशय सुंदर स्काऊट गाईड चे पथसंचलन करून, पथकाने ध्वजवंदना दिली.त्यानंतर गावातील सरपंच श्रीमती सुमनबाई



पवळे, दिलीपराव पाटील पवळे,शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री.मारोती जयवंता पवळे, उपाध्यक्ष श्री.केशवरावजी पुलकंटे तसेच गावातील प्रतिष्ठित नागरिक श्री.पंजाबराव पाटील पवळे, व्यंकटराव पाटील पवळे, विठ्ठल पाटील जाधव, गणेश मुंडकर, माधवराव वाघमारे, गणेश महापुरे, काशिनाथ पाटील कोल्हे, शेषेराव पाटील पवळे आदी मान्यवरांनी तसेच गावातील ईतर नागरिकांनी या नंतर शाळेतील चिमुकल्यांनी स्त्रीभ्रूणहत्या, हिंदू मुस्लिम एकता, आदी संवेदनशील विषयावर खुप सुंदर भाषने सादर केली.त्यानंतर शाळेतील लेझीम पथकाने अतिशय सुरेख असे लेझीमचे सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली

एकंदरीत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कारला शाळेने अतिशय सुंदर नियोजन करून कार्यक्रम यशस्वी करून दाखवला.

त्यावर खुश होऊन विद्यार्थ्यांचे अंगी असलेल्या कला गुणांना वाव दिल्याबद्दल त्यांचे कौतुक म्हणून गावातील प्रतिष्ठित नागरिकांनी १०,०००/-रु अक्षरी दहा हजार रुपये रोख स्वरूपात बक्षिस दिले त्यातून विविध प्रकारच्या ज्या स्पर्धा शाळेत घेण्यात आल्या विध्यार्थ्यांच्या बक्षिसाठी ही मोलाची रक्कम वापरण्यात येणार आहे

त्याचबरोबर गावातील नागरिक एस टी महामंडळ बस चालक माधवराव वाघमारे यांच्या कडून सर्व विद्यार्थ्यांना लिहीण्यासाठी पॅड वितरीत करण्यात आले.ङ्या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेचे मुख्याध्यापक श्री.गजानन जाधव सर, श्री.संतोष कूलकर्णी सर, श्री.ज्ञानोबा मुंडे सर, श्री.प्रदिप शिंदे सर, श्री.पंचकिरण कंधारे सर यांनी परिश्रम घेतले शेवटी कार्यक्रमाचे बहारदार सुत्रसंचलन श्री.खंडु व्यंकटराव नागरगोजे सर यांनी केले.

# दिव्यांग व पत्रकार बांधवांच्या वतीने
# राहुल साळवे यांचा वाढदिवस साजरा

**लोकनेता न्युज नेटवर्क**
**नांदेड /बाजीराव गायकवाड**

बेरोजगार दिव्यांग संघटनेचे अध्यक्ष तथा पत्रकार राहुल साळवे यांचा वाढदिवस जिल्हाधिकारी कार्यालय परिसरामध्ये पत्रकार व दिव्यांग बांधवांच्या वतीने दि.२७ जानेवारी २०२५ सोमवार रोजी साजरा करण्यात आला.ङ्गराहुल साळवे यांनी अनेक दिव्यांगांना न्याय मिळवून देऊन संघटनेची उभारणी केली आहे. त्याचबरोबर पत्रकारितेच्या माध्यमातून अनेक गोरगरिबांना न्याय हक्क मिळवून देण्याचे काम ते करत असतात, त्यांचा ४२ वा वाढदिवस पत्रकार व दिव्यांग बांधवांच्या वतीने पुष्पहार व केक कापून मोठ्या उत्साहात साजरा केला. यावेळी दैनिक लोकनेता नांदेड जिल्हा संपादक बाजीराव पाटील गायकवाड,मराठी पत्रकार हल्ला कृती समितीचे जिल्हाअध्यक्ष रवींद्र संगणवार. ज्येष्ठ पत्रकार अंकुश सोनसळे. प्रल्हाद लोहेकर. राजकुमार कोटलवार. चंद्रकांत गव्हाणे. गंगाधर गच्चे. प्रवीण देशमुख.शेख मौला.शिवाजी हंबर्डे.आशिष कुष्णूरकर. अजीत पाटील.ङ्गशुभम पांचाळ.विजय खंदारे, सोनू सोळंखे.दीपक जोंधळे. गंगाधर सूर्यवंशी.राजू कदम.कैलास जाधव.आनंद सोनटक्के.भारत सुर्यवंशी.शेख रफिक.सचिन डोंगळीकर.पंकज कांबळे,कसबे यासह अनेक पत्रकार बांधवांसह आदित्य पाटील,शेख उमर, संजय धुलधाणी,कार्तिक भरतिपुरम.सय्यद आरिफ,शेख हसन.शेख एजाज, ज्ञानेश्वर बेळे.अजय गोरे,शेख माजिद.प्रशांत हणमंते.रमेश लंकाढाई.गोविंद बोड्डेवार, नागेश निरडी.धर्मेंद्र नालटे.भाग्यश्री नागेश्वर, कल्पना सप्ते यासह अनेक दिव्यांगांची यावेळी उपस्थिती होती.







# रिठा ग्रामपंचायत येथे ध्वजारोहण संपन्न



**लोकनेता न्युज नेटवर्क**
**भोकर /माधव नागलवाड**

भोकर तालुक्यातील रिठा ग्रामपंचायतच्या ठिकाणी प्रजासत्ताक दिन मोठया उत्साहात साजरा करण्यात आला रिठा ग्रामपंचायतचे सरपंच रमेश संगपवाड यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आला ततपूर्वी मान्यवरांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

ध्वजारोहण नंतर शालेय विद्यार्थीसह सामूहिक राष्ट्रगीत घेऊन नंतर कुष्ठरोगाची शपथ घेण्यात आली.यावेळी गावातील प्रतिष्टीत नागरिक राजेश्वर नागलवाड, अशोक नागलवाड, रमण पाटील, गोपीनाथ बोईवाड, माधव कनेवाड,श्रीधरराव देशमुख, श्यामसुंदर मोरे, कल्याणराव मोरे,दिगांबर नागलवाड पत्रकार माधव नागलवाड, परमेश्वर कोरंटलू, जगनाथ बाचेवाड, नामदेव कोरंटलू, अशोक लक्कलवाड,शंकर पाकलवाड पांडुरंग नागलवाड, आप्पाराव बाचेवाड, देविदास करंडेकर मारोती कोरंटलू, दत्ताराम चंचलवाड,यादव धनंजे, पिरसाब शेख, शकील शेख,दयाल बोरकर आदी सह शिक्षक वृंद,अंगणवाडी कर्मचारी, आशा वर्कर,तसेंच गावकरी मंडळी उपस्थित होते.

## प्रजासत्ताक दिनानिमित्त नांदुसा जि.प.शाळेत सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न

**लोकनेता न्युज नेटवर्क नांदेड बाजीराव गायकवाड**

जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा नांदुसा शाळेच्या वतीने प्रजासत्ताक दिनानिमित्त सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात क आला होता यावेळी बालकलाकार प्रगती बालाजी गंगातीरे या मुलीने अतिशय सुंदर नृत्य सादर करून सर्वाचे मन जिंकले यावेळी शाळेचे मुख्याध्यापक पऊळ सर यांनी प्रगती गंगातिरे चे अभिनंदन केले.अशी माहिती टि.व्ही.स्टार सीमा जनकवाडे यांनी दिली.





## माहोरा येथे ज्ञानदीप प्री प्रायमरी स्कूल मध्ये प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

**लोकनेता न्यूज नेटवर्क भोकरदन/राम शिंदे**

जाफराबाद तालुक्यातील माहोरा ज्ञानदीप प्रि प्रीमियर इंग्लिश स्कूल मध्ये २६ जानेवारी प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला यावेळी सरपंच श्री गजानन पाटील लहाने उपसरपंच श्री बाबासाहेब बोरसे, सय्यद हबीबभाई, ज्येष्ठ कार्यकर्ते वामनराव लहाने, शेख महमूदभाई, सामाजिक कार्यकर्ते दादाराव गडकरी, संतोष वरपे, लक्ष्मण वाघ, ज्ञानेश्वर वाघ , दत्ता वैद्य ,प्रभाकर काकफळे, ज्ञानदीप प्रायमरी इंग्लिश स्कूलच्या मुख्याध्यापिका सुलभाताई वाघ, बोरसे मॅडम तेलंग मॅडम इंगळे मॅडम तायडे मॅडम सोनवणे मॅडम यांच्यासह विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने प्रजासत्ताक दिनानिमित्त उपस्थित होत्या यावेळी सांस्कृतिक कार्यक्रम देशभक्तीपर गीते यावेळी विद्यार्थ्यांनी आणि विद्यार्थिनींनी सादर केले तायडे मॅडम यांनी उपस्थित मान्यवरांचे आभार मानले

# उत्कृष्ट कार्याबद्दल डॉ सुधाकर तहाडे यांना प्रशस्तीपत्र देऊन सन्मान

**लोकनेता न्यूज नेटवर्क**
**मुखेड /शिवकुमार बिरादार**

नांदेड जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालय, जिल्हा सामान्य रुग्णालय, नांदेड येथे ७६ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त नांदेड जिल्ह्याचे कर्तव्यदक्ष जिल्हा शल्यचिकित्सक डॉ निळकंठ भोसीकर यांच्या हस्ते ध्वजारोहण सोहळा संपन्न झाला. यावेळी जिल्ह्यात उत्कृष्ठ आरोग्य सेवा देणाऱ्या अधिकारी आणि कर्मचारी यांचा कार्य गौरव करण्यात आला. राष्ट्रीय अंधत्व निर्मूलन कार्यक्रम व महाराष्ट्र मोतीबिंदू मुक्त अभियान अंतर्गत नांदेड जिल्ह्यात नेत्रशल्यचिकित्सक डॉ सुधाकर संभाजीराव तहाडे यांनी उल्लेखनीय काम करत ३१ डिसेंबर २०२४ अखेरीस ९६८ मोतीबिंदू शस्त्रक्रिया पार पाडल्या. या त्यांच्या उत्कृष्ठ कामगिरीबद्दल जिल्हाशल्यचिकित्सक डॉ निळकंठ भोसीकर सर यांच्या हस्ते डॉ सुधाकर संभाजीराव तहाडे यांचा सपत्नीक प्रशस्तीपत्र देऊन सन्मान करण्यात आला. त्यांना या कार्यात सहयोग करणारे नेत्रचिकित्सा




अधिकारी श्री प्रशांत मांजरमकर व श्री लक्ष्मण चंदनकर यांचा देखील प्रशस्तिपत्र देऊन गौरव करण्यात आला. या प्रसंगी अतिरिक्त जिल्हा शल्यचिकीत्सक डॉ संजय पेरके सर, निवासी वैद्यकीय अधिकारी (बा. स.) डॉ राजाभाऊ बुट्टे सर, डॉ हणमंत पाटील सर, डॉ चंद्रशेखर आपनगिरे सर, डॉ शैलेश विभुते सर, डॉ साखरे सर व सर्व अधिकारी/ कर्मचारी यांची उपस्तिथी होती. सेवागौरव करुन प्रोत्साहन दिल्याबद्दल आदरणीय डॉ भोसीकर सर व सर्व वरिष्ठांचे डॉ सुधाकर तहाडे यांनी आभार व्यक्त केले.



## हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंती निमित्त विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप

**लोकनेता न्यूज नेटवर्क**
**मुखेड / शिवकुमार बिरादार**


मुखेड तालुक्यातील बेळी( खुर्द) येथील शाळेमध्ये शिवसेना पक्ष प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंती निमित्त युवा सेना तालुका प्रमुख गजेंद्र पाटील साखरे यांच्या माध्यमातून बेरळी (खुर्द ) येथील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले शिवसेना तालुका प्रमुख बालाजी पा. कबनुरकर, तालुका संघटक प्रभाकर पाटील इंगळे, शहर अध्यक्ष बजरंग भाऊ कल्याने, अमोल पाटील राजूरकर, जिल्हा उपप्रमुख सचिन पाटील भिशे, शहर संघटक सचिन भाऊ रिंदकवाले, युवा सेना शहर अध्यक्ष बालाजी भाऊ बाबळे, त्र्यंबक पाटील हसणाळकर , बंटी पाटील चांडोळकर, शिवानंद भाऊ बंडे बेळी खु. चे सरपंच भागवत भाऊ तोटेवाड, उपसरपंच सिद्धार्थ भाऊ कांबळे, सागर पाटील बेळीकर, बालाजी बेळीकर , जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक सर्व कर्मचारी व इतर ग्रामस्थ उपस्थित होते

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव

## अध्यक्षपदी क–हेवडगाव येथील सरपंच परिवंत गायकवाड यांची निवड तर उपाध्यक्षपदी अरूण कांबळे से.नि.पोलिस तर सचिवपदी ग्रामसेवक नवनाथ लोंढे,कोषाध्यक्षपदी सिताराम घोडके सर यांची सर्वानुमते निवड जाहीर..!

**लोकनेता न्युज नेटवर्क**
**आष्टी(अण्णासाहेब साबळे)**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर जन्म महोत्सव १४ एप्रिल रोजी मोठ्या उत्साहात आणि श्रद्धेने साजरा केला जातो.या दिवशी डॉ.आंबेडकर यांच्या कार्याचा गौरव केला जातो, विशेषत:त्यांच्या योगदानामुळे भारतीय संविधानाची रचना, सामाजिक न्याय आणि समता यासाठीच्या लढ्याची आठवण केली जाते.ङ्गमहोत्सवाचे आयोजन आष्टी शहरातील विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती महोत्सब २०२५ साजरा करण्यासाठी भिमनगर मधील संकल्प बुद्ध विहारात आष्टी येथील सर्व भिम प्रेमी यांची मंगळवार दि २१जानेवारी रोजी रात्री ९:००वाजता बैठक घेण्यात आली.बैठकीच्या अध्यक्षस्थानी डॉ युवराज तुपारे यांच्या अध्यक्षतेखाली जयंती समीती स्थापन करण्यात आली.यावेळी सर्वानुमते विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंतीच्याङ्गङ्गअध्यक्षपदी क–हेवडगाव येथील सरपंच,कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक,तथा गव्हर्मेंट कॉन्ट्रॅक्टर प्ररिवंत गायकवाड यांची निवड करण्यात आली तर उपाध्यक्षपदी अरूण कांबळे सेवानिवृत्त पोलिस यांची तर सचिवपदी नवनाथ लोंढे ग्रामसेवक संघटना तालुकाध्यक्ष दिव्यांग कर्मचारी संघटनेचे तालुकाध्यक्ष,कोषाध्यक्षपदी सिताराम घोडके सर यांची निवड करण्यात आली.या बैठकीला नगरसेवक अरूण भैय्या निकाळजे,राजु निकाळजे,दिपक निकाळजे,रूपेश निकाळजे,मिलिंद निकाळजे,शशिकांत निकाळजे,माजी नगरसेवक सादिक कुरेशी,दिलीप निकाळजे,सनी काळपुड,कुणाल निकाळजे,शंकर निकाळजे,संदिप पगारे,नितिन र.निकाळजे,युवराज निकाळजे,सचिन निकाळजे,गणेश गायकवाड,रुपेश कांचळे,अनिकेत रमेश निकाळजे,राहुल निकाळजे,प्रदिप पगारे,ॲड किशोर निकाळजे,अजय निकाळजे,अविनाश निकाळजे,किशोर



निकाळजे,संदेश निकाळजे,बबलू निकाळजे,सौरभ निकाळजे,ऋतिक निकाळजे,नेल्सन निकाळजे,अक्षय मुत्रा निकाळजे,निखिल शिंदे,प्रकाश निकाळजे,योगेश तुपारे,सुजित निकाळजे,धीरज निकाळजे,सुमित शिंदे,अविनाश व निकाळजे,सागर निकाळजे,दिपक म.निकाळजे, नितीन निकाळजे,समीर सिरसाठ, अक्षय गो.निकाळजे,सागर खंडागळे, आनंद ससाणे,राजदिप निकाळजे, महेश निकाळजे,सिद्धार्थ शिंदे,मुकेश निकाळजे,अविनाश भा.निकाळजे,नारायण निकाळजे,शुभाष क.निकाळजे,प्रकाश निकाळजे,सिद्धार्थ आ.निकाळजे,यांच्यासह यावेळी सर्व समस्त भिम सैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# प्रजासत्ताक दिन कन्या प्रशालेत विविध उपक्रमांद्वारे साजरा







**लोकनेता न्यूज नेटवर्क**
**गेवराई, दि. २७ (प्रतिनिधी ) –**

गेवराई येथील जिल्हा परिषद कन्या प्रशालेत सकाळी झेंडावंदन शाळेचे मुख्याध्यापक सोळुके यांच्या हस्ते सर्वांच्या उपस्थितीत संपन्न झाले. ढोल लेझीम पथकाच्या संचलनात प्रभात फेरी काढण्यात आली .ङ्गविविध नाट्य, नृत्य,गीत, भाषणे आणि विविध गुणदर्शनाचे कार्यक्रम आणि हास्य नाटिका तसेच प्रबोधनपर नाटिकाचे सादरीकरण करत प्रशालेच्या आवारात शिक्षक, पालकांच्या उपस्थितीत साजरा करण्यात आला .ङ्गऊर्दू आणि मराठी माध्यमाच्या विद्यार्थीनींनी प्रचंड उत्साह दाखवत सहभाग नोंदवत कार्यक्रमात रंगत आणली .ङ्गलेझीम पथक, देशभक्तीपर समुहगीते, वैयक्तिक गीते,समुह नृत्य, विनोदी नाटिका,संदेशपर नाटिका सादर करुन स्वच्छतेचे महत्त्व, प्रदुषणाचे दुष्परिणाम,ङ्गवाढती लोकसंख्या वृक्षतोड, पर्यावरणाचा होत चाललेला ऱ्हास आणि नाश इत्यादी आणि यावरील उपाययोजना करण्याचा संदेश इयत्ता सातवीच्या बालकलावंत विद्यार्थीनिंनी आपल्या नाटीकेतुन दिला. श्वास कोंडला श्वासाचा....उपाय शोधा ऱ्हासाचाङ्गया नाट्य कलावंत लेखक शाहीर विलास सोनवणे लिखित नाटिका उत्कृष्टपणे सादर करण्यात आली.ङ्गकार्यक्रम यशस्वीतेसाठी बारहाते , कुमार गर्कळ , खरात , अडागळे, गलधर , गायकवाड , देशमुख ,साजेद , गुंजाळ , श्रीमती कोकाटे,मिसाळ, चोपडे , शिंदे , शायस्ता बाजी,रुखैया बाजी,फरहीन बाजी, शबाना बाजी,रुही मीस, प्रतिक्षा मीस ,इरम मीस यांनी सहकार्य केले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मयुरीमीस,कोमल मिस यांनी केले.खाऊवाटपाचा कार्यक्रम पार पडला आणि ङ्गसर्व पालकांचे आभार व्यक्त करुन शेवटी अध्यक्षांच्या परवानगीने कार्यक्रमाची सांगता झाली .

## जि.प.प्रा शाळा वडसा येथे महापपुरुषांच्या प्रतिमेविनाच झेंडा वंदन.

**लोकनेता न्यूज नेटवर्क /माहूर:प्रतिनिधी**

दि. २६ जानेवारी रोजी संपूर्ण भारतामध्ये प्रजासत्ताक दिन म्हणून साजरा केला जातो जिल्ह्यातील तालुक्यातील गाव, खेड्यामध्ये सुद्धा यां दिवशी शासनाचे परिपत्रक असून सुद्धा काही ठिकाणी ते पाळल्या जात नाही अशीच घटना माहूर तालुक्यातील प्रजासत्ताक दिनानिमित्य जि प प्रा शाळा वडसा येथे घडली जर शिक्षकच विध्यार्थ्यांना महापुरुषांच्या कर्तृत्वाबद्दल डोळे झाक करत असेल तर विध्यर्थ्यांचे भवितव्य अंधारात असेल यात शंका नाही शाळे मध्ये महात्मा गांधी आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन न करता केवल भारतमातेचे पूजन करून दैवतिकारणाचा संदेश देत शिस्तभंग करून महापुरुषांना प्रेरणे पासून वंचित ठेवण्याचे कारस्थान केल्या बद्दल सदर प्रकरणाची चौकशी करून मुख्याध्यापकाविरोध शिस्तभंगाची कारवाई करून निलंबित करण्यात यावे अशा मागणीचे निवेदन सामाजिक कार्यकर्ते सिद्धार्थ तामगाडगे यांनी गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती माहूर यांना सादर केले आहे निवेदनाची प्रत आणि फोटो शिक्षणाधिकारी प्राथमिक जिल्हा परिषद नांदेड यांना सादर करण्यात आली आहे. कोणत्याही राष्ट्रीय कार्यक्रमात महात्मा गांधी व विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन व अभिवादन करूनच पुढील कार्यक्रम करावा असे शासन परिपत्रक आहे असे असताना जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वडसा येथील मुख्याध्यापक श्री माधव कोंडबाजी बाबळे यांनी जाणीवपूर्वक महापुरुषांना डावळत केवळ भारत मातेची प्रतिमा पूजनात ठेवून पुरोगामी राज्यामध्ये दैवती करण्याचा संदेश प्रसारित केला आहे यामुळे सर्व संविधान प्रेमी व महापुरुषांना आदर्श मानणाऱ्या नागरिकांच्या भावना दुखावल्या आहेत

## सगरोळी येथे ग्रामदैवत शंभू महादेव मंदिराचे जिरणोध्दार शिवलिंग विरभंद्र मुर्ती प्राणप्रतिष्ठा व कलशारोहन सोहळ्याचे आयोजन

**लोकनेता न्यूज नेटवर्क**
**बिलोली गौतम गावंडे**



बिलोली तालुक्यातील सगरोळी येथे श्री श्री श्री १००८ जगद्गुरु भीमाशंकर लिंग शिवाचार्य महास्वामी केदार पीठ व सर्व शिवाचार्य महाराज यांच्या उपस्थितीत शंभू महादेव मंदिराचे जिरणोध्दार शिवलिंग वीरभद्र मूर्ती प्राणप्रतिष्ठा व कलश रोहन सोहळा दिनांक ३१.१.२०२५ रोजी सकाळी ९:३० वाजता आयोजित केले आहे दिनांक ३०.१.२०२५ रोजी सायंकाळी ४:०० श्री श्री श्री १००८ जगद्गुरु भीमाशंकर लिंग शिवाचार्य महास्वामी केदार पीठ व बसवलिंग शिवाचार्य महाराज जुकलकर शिवानंद शिवाचार्य महाराज तमलुरकर सोमलिंग शिवाचार्य महाराज बिचकुंदेकर मल्लिकार्जुन शिवाचार्य महाराज खतगावकर सिद्धदयाळ शिवाचार्य महाराज बेटमोगरेकर शंकर लिंग शिवाचार्य महाराज हानेगावकर विरुपाक्ष शिवाचार्य महाराज मुखेडकर चंद्रशेखर महाराज देगलूरकर बसवलिंग शिवाचार्य महाराज कौलासकर राजशेखर शिवलिंग शिवाचार्य महाराज अहमदपूरकर आचार्य गुरुराज स्वामी अमदपुरकर सिद्धेश्वर महाराज सुकणीकर सिध्दायप्पा महाराज एकलारकर यांचे मुख्य रस्त्यावरून भव्य मिरवणूक निघेल व यानंतर सायंकाळी ७:०० वाजता प्रवचन होईल

तसेच दिनांक ३१-१-२०२५ रोजी सकाळी ९:३० वाजता वरील सर्व गुरुवर्य यांच्या उपस्थितीत व श्री.श्री. १००८जगद्गुरु भीमाशंकर शिवाचार्य महास्वामी केदारपीठ यांच्या शुभहस्ते शंभू महादेव मंदिराचे व शिवलिंग वीरभद्र मूर्ती प्राणप्रतिष्ठा कलश रोहन सोहळा आयोजन करण्यात आले आहे तरी पंचक्रोशीतील सर्व समाज बांधवांनी व नागरिकांनी उपस्थित राहावे असे आव्हान महादेव मंदिर समिती समस्त गावकरी मंडळी सगरोळी यांच्याकडून करण्यात आले आहे

## जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सुरंगळी मराठी शाळेत बाल आनंद नगरी मेळावा मोठ्या उत्साहात साजर

**लोकनेता न्यूज नेटवर्क**
**भोकरदन/राम शिंदे**

दानापूर केंद्रातील सुरंगळी मराठी या शाळेत दिनांक २४ जानेवारी २०२५ रोजी अत्यंत उत्साहात बाल आनंद मेळावा घेण्यात आला या कार्यक्रमात १३७ पटसंख्या असलेल्या शाळेतील विद्यार्थ्यांपैकी ५० विद्यार्थ्यांनी विविध खाद्यपदार्थाचे मॉल लावले होते, विद्यार्थ्यांमधील सुप्त कलागुणांना वाव देण्याच्या दृष्टिकोनातून व आनंददायी वातावरण निर्मिती च्या दृष्टीने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. ड्या कार्यक्रमास शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री विष्णू

साकरूबा दांडगे व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री गणेश वानखेडे श्रीमती वर्षाताई गवळी किशोर जाधव संजय दांडगे उपस्थित होते या कार्यक्रमाचे उद्घाटन गावातील ज्येष्ठ नागरिक श्री सुरोशे साहेब व शालेय



व्यवस्थापन समितीचे माजी अध्यक्ष तथा शिक्षण प्रेमी श्री संतोष जी काळे तसेच ग्रामपंचायतचे सन्माननीय सदस्य गजानन काळे यांनी केले.

या कार्यक्रमास प्रामुख्याने केंद्राचे केंद्रप्रमुख तथा मुख्याध्यापक श्री गणेश सोळुंके यांनी कार्यक्रमाची प्रास्ताविक करून या कार्यक्रमाचे व्यवसायभिमुख शिक्षण कौशल्य साठी होणारे फायदे या निमित्ताने आपल्या प्रास्ताविक भाषणात सांगितले या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेचे आदर्श शिक्षक श्री रवी अंभोरे सर यांनी केले तर या कार्यक्रमाचे संपूर्ण व्यवस्थापन श्री आर के गांगे यांनी केले या कार्यक्रमाला शाळेतील सर्व शिक्षक श्री प्रकाश राठोड श्रीविष्णू गिरे श्री कृष्णा बावस्कर यांनी सर्व विद्यार्थ्यांचे नियोजन करून परिश्रम घेतले

अत्यंत आनंदात या कार्यक्रमास गावातील सातशे ते आठशे लोकांनी विद्यार्थ्यांसोबत वेगवेगळया खाद्यपदार्थाचा आस्वाद घेऊन आर्थिक व्यवहार साधला त्यामुळे विद्यार्थ्यांच्या खिशात अंदाजे पंचवीस ते तीस हजारापर्यंत उलाढाल झाल्याची बोलल्या जाते.

विद्यार्थ्यांमध्ये आर्थिक व्यवहारातील फायदे नफे तोटे त्यामुळे कळण्यास नक्कीच फायदा झाला आहे.

शाळेला वेळोवेळी मार्गदर्शन करणारे पत्रकार बंधू श्री सुभाष जी मैनाजी वर्पे यांनी सुद्धा या कार्यक्रमात सहभाग घेऊन शाळेला यामुळे निश्चित फायदे होईल अशी भूमिका मांडली.

## विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास हेच शिक्षणाचे ध्येय- दिपकभैय्या सदाशिवे

**लोकनेता न्यूज नेटवर्क**
**भोकरदन/राम शिंदे**

दिपभारती माध्य. व उच्च माध्य. विद्यालय दानापूर येथे वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते .यावेळी सम्राट अशोक शिक्षण संस्थेचे सचिव दिपक भैय्या सदाशिवे बोलत होते .विद्यार्थी हा परीक्षार्थी न राहता त्याने त्याचा शिक्षणाच्या माध्यमातून सर्वांगिण विकास साधला पाहिजे असे प्रतिपादन त्यांनी केले . सुरुवातीला मुख्याध्यापक वाय.एस.गवळी व दिपक भैय्या सदाशिवे यांचे हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून दिपप्रज्वलन करण्यात आले . स्नेहसंमेलनामध्ये अनेक विद्यार्थ्यांनी व विद्यार्थिनींनी मराठी ,हिंदी व इतर प्रादेशिक भाषेतील गाण्यांवर नृत्य सादर केले व सर्वांची वाहवा मिळवली .स्नेहसंमेलनाला संस्थेचे अध्यक्ष श्री सुदामराव सदाशिवे साहेब यांनी शुभेच्छा दिल्या . स्नेहसंमेलनात रिल स्टार योगेश गोरे व त्यांच्या सुविद्य पत्नी शिवकन्या गोरे यांनी सादरीकरण करून सर्व प्रेक्षकांना खळखळून हसवले. कार्यक्रमाला दानापूर सह पंचक्रोशीतील भायडी , तळणी ,दगडवाडी



, निंबोळा , कठोरा (बाजार) वडशेद ( जुने व नवे ), सुरंगळीवाडी ,विरेगाव ,चोऱ्हाळा , गोद्री व परिसरातील पालकांची व नागरीकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती . कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री एस.एस. दांडगे व श्री पवार एस.डी. यांनी केले आभार प्रदर्शन श्री वाय एच कापरे यांनी केले .कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेचे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले

## लोहा सार्वजनिक शिवजयंती ची कार्यकारिणी आ.प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या उपस्थितीत जाहीर

## अध्यक्षपदी पत्रकार केशव पवार यांची निवड



**लोकनेता न्युज नेटवर्क**
**लोहा /विशाल घंटे**

लोहा शहरात रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांची १९ फेब्रुवारी रोजी ३९५ वी जयंती मोठ्या उत्साहात विविध सामाजिक उपक्रमांनी साजरी करण्यात येणार असून सदरील सार्वजनिक शिवजयंतीची कार्यकारिणी आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या प्रमुख उपस्थितीत लोहा येथील व्यंकटेश गॉर्डन येथे जाहीर करण्यात आली.

लोहा येथील सार्वजनिक शिवजयंतीची कार्यकारिणी पुढीलप्रमाणे - अध्यक्ष पत्रकार केशव पाटील पवार , स्वागताध्यक्ष -जीवन चव्हाण , उपाध्यक्ष - गणेश कल्याणकार , सचिव - साईनाथ फाजगे, सहसचिव पपन बोडके, कोषाध्यक्ष - योगेश बंडू कदम, मिरवणूक प्रमुख - बालासाहेब पाटील कवठेकर, प्रसिद्धी प्रमुख- पत्रकार विलास सावळे, इमाम लदाफ, , रमेश पाटील पवार, शुभम उतरवार, सजावट प्रमुख -अनिल धुतमल, मार्गदर्शक - माजी जि.प. सदस्य प्रविण पाटील चिखलीकर, माजी उपनगराध्यक्ष केशवराव मुकादम, दत्ताभाऊ वाले, , नारायण येलरवाड, आदी जंबो कार्यकारिणीची निवड करण्यात आली.

माणिकराव मुकादम,साहेबराव पाटील काळे, नागनाथ चुडावकर सुरेश गायकवाड आप्पाराव पवार, व्यंकट जंगले,बाळू पवार , ज्ञानेश्वर भिसे, शिवाजी पवार उध्दवराव पाटील सुर्यवंशी, हरीभाऊ चव्हाण, दिनेश तेललवार, अर्जुन राठोड, अविनाश पाटील सुर्यवंशी , रमेश राठोड, आदी उपस्थित होते.

## माहूर नगरपंचायत ला दोन सुवर्ण तर दोन रोप्य पदक

**नगरपंचायत कर निर्धारक पदावर कार्यरत असताना कुमारी स्वाती गुव्हाडे हिने घेतला विभागीय स्पर्धेत सहभाग**
**नगराध्यक्ष मुख्याधिकार्यासह कर्मचारी पदाधिकाऱ्यांनी केला हृदय सत्कार**



**लोकनेता न्यूज नेटवर्क**
**श्रीक्षेत्र माहूर:राजकिरण देशमुख**

महाराष्ट्र शासनाचे नगरपरिषद प्रशासन संचालनालय विभाग मुंबई यांचे कडून आयोजित विभागीय स्तरावर पारपडलेल्या क्रीडा स्पर्धेत छत्रपती संभाजी नगर विभागातील नगर परिषदा व नगरपंचायतीच्या क्रीडा स्पर्धेत माहूर नगर पंचायत कडून प्रतिनिधित्व करताना नगरपंचायत माहूर येथे करनिर्धारक व प्रशासकीय सेवा या पदावर कार्यरत असलेल्या स्वाती बबनराव गुव्हाडे यांनी ३ की.मी. वॉकिंग स्पर्धेत सुवर्णपदक, समुह गित गायन स्पर्धेत सुवर्ण पदक, थाळी फेक स्पर्धेत रौप्य पदक तर गोळा फेक स्पर्धेत रौप्यपदक असे एकूण ४ पदके मिळवत माहूर नगर पंचायत चे नाव विभागीय स्तरावर चमकवले आहे.

या नेत्रदीपक कामगिरी बद्दल नगरपंचायत माहूर येथे सत्कार कार्यक्रम घेण्यात आला या कार्यक्रमात नगराध्यक्ष फीरोज भैय्या दोसाणी, उपाध्यक्ष ज्ञानेश्वर लाड, मुख्याधिकारी विवेकजी कांदे व कार्यालय अधिक्षक तथा लेखापाल वैजनाथ स्वामी यांचेसह सर्व अधिकारी कर्मचारी यांनी या यशाबद्दल स्वाती गुव्हाडे यांचा हृदय सत्कार अभिनंदन करुन पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या यावेळी बोलतांना नगराध्यक्ष फीरोज दोसाणी म्हणाले असेच माहूर नगर पंचायत च्या वतीने कर्मचारी यांनी वेळोवेळी होणाऱ्या विविध खेळामध्ये यश संपादन करुन माहूर नगर पंचायत चे नाव उज्वल करावे असे आवाहन करतो.शेवटी या सत्काराला उत्तर देताना स्वाती गुव्हाडे यांनी मनोगतात केलेल्या सन्मान आणि सत्काराबद्दल आभार मानले. यावेळी मान्यवरासह लेखापाल व लेखापरीक्षक विशाल मरेवाड,स.कार्यालय अधिक्षक संदिप गजलवाड, इंजिनिअर विशाल ढोरे,स.प्रकल्प अधिकारी देविदास जोंधळे,शहर समन्वयक शेख मजहर, गुंठेवारी विभागाचे विजय शिंदे, स्वच्छता विभाग प्रमुख गणेश जाधव,पाणी पट्टी वसुली प्रमुख कल्याण पाटील, मालमत्ता कर विभाग प्रमुख सुरेंद्र पांडे,शेख नयुम, विलास बोरकर,अवि बरडे, समाधान, सादिकभाई,प्रविन शेंडे,ज्योती नलावडे,शकीलाबी व ईतर कर्मचारी उपस्थित होते.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904